नि.दि.दावा.क्रमांक.१८५/२०१९

निशाणी ३९ लगत

**वादीतर्फे साक्षीदार क्र. १ चा पुढील सरतपास शपथेवर सुरु. वादीतर्फे वकिल श्री. के.ए.फुंदे.**

१३. मी निशाणी ४ सोबत काही दस्त दाखल केले आहेत. मी फेरफार नोंद क्र.३९२२ सही शिक्कयाची दाखल केली आहे. त्यास निशाणी ४० देण्यात येते. तसेच मी गट क्र.५३७ चा सही शिक्क्याचा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्यास नि.४१ देण्यात येते. गट क्र.५३७ चा खरेदीखताची मुळ प्रत ही पोलीस स्टेशनला आहे.

सरतपास संपला.

**साक्षीदाराचा उलटतपास प्रतिवादींतर्फे वकील श्री.पी.एम.आडुडे.**

१४. माझे तिसरीपर्यंत शिक्षण झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती पोलीस खात्यामध्ये नोकरीला होते. हे म्हणणे खरे नाही की, जमीनीचे जे काही व्यवहार झाले आहेत ते माझ्या पतीने केलेले आहेत. मी बालासाहेब आडतराव यांच्यासोबत खरेदीखतापूर्वी ठरावपत्र केल्याचे मला आठवत नाही. खरेदीखत करण्यापूर्वी मी पेपरला जाहीर प्रगटन दिलेले नव्हते. आजरोजी शेतामध्ये सोयाबीनचे पीक आहे. ट्रॅक्टरने शेतीमध्ये पेरणी केली आहे. मला सदर ट्रॅक्टरचा नंबर आठवत नाही. मला वार, वर्षसुध्दा आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वादग्रस्त जमीनीमध्ये जाऊ नये असा माझ्याविरुध्द मनाई आदेश पारीत करण्यात आलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर दाव्यामध्ये तात्पुरता मनाईहुकूमाचा अर्ज दिला होता त्याचा निकाल माझ्याविरुध्द लागलेला आहे. मी नि.१७ वर पारीत झालेल्या आदेशाविरुध्द जिल्हा न्यायालयात अपील दाखल केले किंवा नाही हे सांगू शकत नाही.

१५. दि.०१.१२.२०१९ रोजी प्रतिवादींनी मला शेतामध्ये अडथळा आणला होता. आम्हाला हरभरा पेरण्यासाठी शेतात जायचे होते. प्रतिवादींनी पिकाची

नासधुस केली होती त्याची तक्रार आम्ही पोलीस स्टेशनला केली होती. मला त्याचा वार व तारीख सांगता येणार नाही. मी त्या तक्रारीची प्रत प्रकरणात दाखल केली आहे. पटलावरील अभिलेखाचे अवलोकन केले असता पटलावर तक्रारी अर्जाची प्रत आढळून आली नाही. सन २०१९ मध्ये प्रतिवादींनी सखुबाई भोसले, शिलाबाई भोसले, संकेत भोसले व अजून एक मजूराला शिवीगाळ केली होती. मी पोलीस स्टेशनला अर्ज दिला परंतु तो अर्ज पोलीसांनी घेतला नाही व त्यांनी माझ्याकडे पैशांची मागणी केली. मी पोलीसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे तक्रार दिली नाही. माझे पती अर्ज घेऊन पोलीसांकडे गेले होते त्यामुळे पैशाची मागणी कोणी केली हे मला सांगता येणार नाही.

१६. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती पोलीसात असल्यामुळे त्यांची पोलीस स्टेशनमध्ये चांगली ओळख होती. माझ्या पतीने पैसे मागितल्याची तक्रार वरिष्ठांकडे केली होती किंवा नाही याबाबत मला आठवत नाही. मी प्रतिष्ठीत व्यक्तींना घेऊन शेतामध्ये गेले नव्हते. माझे दोन पुतने, प्रभु भोसले व माझा भाऊ अशा प्रतिष्ठीत व्यक्तींना मी सोबत घेतले होते. मी खरोळा गावातील संभाजी चौकात प्रतिवादींना बालावून घेऊन प्रतिष्ठीत व्यक्तींसोबत चर्चा केली होती. संभाजी चौकामध्ये १५ ते २० दुकान आहेत हे मला आठवत नाही. संभाजी चौकात माझ्या पाहुण्याचा दवाखाना आहे हे मला आठवत नाही. केतन गोडभरले हे माझे नातेवाईक आहेत व त्यांचे दुकान संभाजी चौकात आहे.

१७. प्रतिवादींनी चौकामध्ये जोरात जमीनीमध्ये एक पिकाची काडी ठेवणार नाही, तुला आमचे काय करायचे ते कर असे म्हणाले होते. हे म्हणणे खरे आहे की, संभाजी चौकामध्ये जाणाऱ्या येणाऱ्यांची वरदळ असते. भांडणाचा आवाज ऐकून चौकामध्ये कोणीही जमा झाले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, संभाजी चौक खरोळा येथे कोणतीही बैठक झाली नाही व प्रतिवादींनी मला कोणतीही धमकी दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखत दस्त क्र.११९१/११ हा चार लाखाच्या हमीपोटी लिहून दिलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी चार लाख व त्यावरील व्याज देऊनसुध्दा आम्ही प्रतिवादीच्या लाभात खरेदीखत करुन दिले नाही. हे म्हणणे

खरे नाही की, चार लाख व त्यावरील व्याज देऊनसुध्दा माझ्या पतीने दि.०८.०३.२०१९ रोजी १८,६५,०००/- मागणी प्रतिवादींकडे केली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर रक्कम देयीपर्यंत खरेदीखत करुन देणार नाही अशी प्रतिवादींना आम्ही धमकी दिली होती.

१८. त्यानंतर प्रतिवादीने माझ्या पती व माझ्याविरुध्द सावकारकी अंतर्गत निबंधक लातूर यांच्याकडे लेखी तक्रार दिली होती याबाबत मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या अनुषंगाने सहाय्यक निबंधक रमाकांत आग्रे रेणापूर यांनी आमच्या घरावर धाड टाकली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या धाडीमध्ये सहाय्यक निबंधक यांना एकुण ४३ दस्त सापडले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या अनुषंगाने दि.०८.०२.२०२० रोजी गु.र.नं.७२/२०२० हा माझ्या व माझ्या पतीविरुध्द दाखल करण्यात आला आहे. साक्षीदार स्वतः सांगते की, खोटा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याबाबतचा गुन्हा प्रलंबित आहे याबाबत मला माहित नाही.

१९. प्रतिवादीने सहाय्यक निबंधक यांच्याकडे खरेदीखत रद्द करण्यासाठी अर्ज दिला होता याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र.९ मधील मजकूर हा खोटा व चुकीचा लिहीलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझ्या पतीने हरंगुळ येथील पाहुणे घेऊन वादग्रस्त जमीनीचा ताबा घेण्याचा प्रयत्न केला व पिकाचे नुकसान केले. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त जमीनीवरील प्रतिवादीचा ऊस हा रेणा कारखान्याला गेला होता. हे म्हणणे खरे नाही की, रेणा कारखान्याला माझ्या पतीने ऊस माझा आहे त्यामुळे तो घेऊ नये असा अर्ज माझ्या सहीने दिला आहे. त्यामुळे दि.०७.०१.२०२१ रोजी कारखान्यातील अधिकाऱ्यांनी वादग्रस्त जागेवर येऊन पंचनामा केला होता हे खोटे आहे. त्यामुळे त्याचे बील कारखान्याने प्रतिवादीला दिले हे खोटे आहे.

२०. हे म्हणणे खरे नाही की, सन २०११ पासून वादग्रस्त जमीनीवर माझा ताबा व मालकी नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीची जमीन हडप करण्यासाठी सदरचा खोटा दावा मी दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त

जमीनीवर माझा ताबा नसल्यामुळे प्रतिवादींनी कधीही आम्हाला हरकत आणली नाही. हे म्हणणे खरे नाही की, पैशाच्या सुरक्षेसाठी प्रतिवादीने नाममात्र खरेदीखत विनाताब्याचे करुन दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी वादग्रस्त जमीनीवर प्रतिवादीचा ताबा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला प्रतिवादीने कधीही शिवीगाळ केली नाही व धमकी दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रातील मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला

फेरतपास नाही श्रवणोत्तर निवेदन सिकृत्ती

Digitally signed by DNYANESHWAR MADHUKAR GITTE
Date: 2025.07.29 17:02:58 +0530

दिनांक २९/०७/२०२५ (ज्ञा.म.गित्ते)

रेणापुर सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रेणापुर

(कोर्ट नंबर २)